## निशाणी क्र. ६९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. ६ रविंद्र शंकर वारंग हे दि. २१/०४/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी मयत झाल्याची माहिती सदर वादीस वेळीच मिळू शकली नाही. तसेच दरम्यानचे कालावधीत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झाल्याने या कामी मुदतीत वारस दाखल करणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ६ विरुध्द सदर दावा अबेट झालेला आहे. तरी वादीचा दावा पुढे चालविण्याच्या दृष्टीने अबेटमेंट आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तीक नाही. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ६ हे दिनांक २१/०४/२०२१ इ. रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटप, पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादी चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**–आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: ०४/१०/२०२१